**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अकोला कृषी हवामान सल्ला** **शुक्रवार दिनांक – २८.०२.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक २९ फेब्रुवारी ते ०४ मार्च २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २९/०२ | ०१/०३ | ०२/०३ | ०३/०३ | ०४/०३ |
| पाऊस (मिमी) | ० | ३ | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३५ | ३४ | ३४ | ३४ |
| किमान तापमान (अं.से.) | १७ | १८ | १८ | १९ | १८ |
| ढग स्थिती (आकाश) | स्वच्छ | अंशतः ढगाळ | स्वच्छ | स्वच्छ | स्वच्छ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ६० | ५५ | ४५ | ४० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | १८ | १९ | २२ | १७ | १५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १ | १ | १ | १ | १ |
| वा-याची दिशा | ११२ | १६१ | २०८ | २५७ | २८८ |

| | | |
|---|---|---|
| हवामानाचा इशारा | हवामान खात्याच्या अंदाजानुसार विदर्भात दिनांक २९ मार्च ते ०१ मार्च रोजी दरम्यान काही तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाट व गारपीटसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे व पुढील तीन दिवस हवामान कोरडे राहील. अशा परिस्थितीमध्ये शेतकर्यांनी घ्यावयाची काळजी- १. पक्व झालेली पिके ज्वारी, हरभरा, गहू, करडई इत्यादींची काढणी करून घावी. २.काढणी झालेल्या पिकांची मळणी करून सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी. ३.मळणी करणे शक्य नसल्यास काढलेली पिके पावसापासून संरक्षण होण्याच्या दुष्टीने योग्यरीत्या झाकून ठेवावीत. | |
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कपाशी | पात्या / बोंड | उपटलेल्या पराठ्याचे ढीग शेतात न ठेवता वेचून घावेत त्याचा कुटीमशीन यंत्राद्वारे कुट तयार करून त्याचा वापर कंपोस्ट तयार करण्यासाठी करावा म्हणजे त्यामध्ये असलेल्या किडींच्या सुप्त अवस्थांचा नाश होईल तसेच शेत खोल नांगरणी करून तयार करावे. |
| गहू | वाढ | गहु पिकाला पिकाच्या आवशक्यतेनुसार ओलिताची वेवस्था करावी. वेळेवर पेरणी केलेल्या कोरडवाहू पिक पक्व होताच त्याची कापणी करावी, शेतावर योग्य जागेवर गंजी लावावी. मळणी यंत्राने मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घावी. |
| हरभरा | वाढ | शेतकरी बंधूनी आपल्या कडील स्थानिक हवामान पाहून वेळेवर पेरणी केलेल्या हरभरा पिक पक्व झाले असल्यास त्याची कापणी करून मळणी करावी व तयार झालेला माल सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. पिक दाणे भरण्याच्या अस्वथेत असल्यास पाण्याचा ताण पडू देवू नये. |
| उन्हाळी तीळ | पेरणी | वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी सुर्यफुल पिकात आंतर मशागत करून शेत भुसभुशीत ठेवावे, त्याकरिता ३ वेळा डवरणी आणि आवश्यकतेनुसार २-३ वेळा निंदणी करून पिक ४५ दिवसाचे होईपर्यंत तण विरहित ठेवावे. |
| उन्हाळी भुईमुग | वाढणी | वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी भुईमूग पिकात साधारणतः ६ ते ७ आठवडे पर्यंत आंतर मशागत करून शेत भुसभुशीत ठेवावे, त्याकरिता ३ वेळा डवरणी आणि आवश्यकतेनुसार २-३ वेळा निंदणी करावी. ओलीतवेव्स्थापन साठी जमिनीच्या मगदुराप्रमाणे यथायोग्य अंतराने एकंदर १५-१७ पाण्याच्या पाळया लागतील. पेरणीनंतर लगेच ओलीत करावे. |
| करडई | काढणी | शेतकरी बंधूनी आपल्या कडील स्थानिक हवामान पाहून करडई पिकाची काढणी करावी व तयार झालेला माल सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |

| | | |
|---|---|---|
| मिरची | फुल | मिरची पिकावरील पांढऱ्या माशीच्या नियंत्रासाठी पायरीप्रॉक्झीफेन ५ टक्के + फेनप्रोपथ्रीन ३० टक्के ३.५ मि.ली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढ | शिफारशीनुसार उन्हाळी भेंडीची लागवड फेब्रुवारी महिन्या पर्यंत करावी, करिता सुधारित जाती मध्ये अकोला बहार, अर्क अनामिका, पुसा मखमली, परभणी क्रांती, पुसा अ-४ या वाणांचा वापर करावा. लागवड सपाट वाफ्यामध्ये उन्हाळी पिकास ४५ * ३० सें.मीं अंतरावर बी टोकावे व पिकाच्या गरजेनुसार ८-१० दिवसांनी पाण्याच्या पाळया द्याव्या. गावर, चवळी, काकडी, दुधीभोपळा, दोडका, कारली, ढेमसे, पालक, मेथी आणि कोथिंबीर यांची लागवड करावी. उन्हाळी मिरची, वांगे व टमाटे च्या ४ ते ६ आठवड्या वयाचे रोपांची लागवड करावी. |
| उन्हाळी सुर्यफुल | वाढ | वेळेवर पेरणी केलेल्या उन्हाळी सुर्यफुल पिकात आंतर मशागत करून शेत भुसभुशीत ठेवावे, त्याकरिता ३ वेळा डवरणी आणि आवश्यकतेनुसार २-३ वेळा निंदणी करून पिक ४५ दिवसाचे होईपर्यंत तण विरहित ठेवावे. |
| कांदा | लागवड | कांदा पिकातील फुलकिडी व जांभळा करपाच्या एकत्रित नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० ईसी १५ मिली किंवा लॅम्ब्डा सायहॅलोथ्रीन ५ ई.सी ६ मिली किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २४ मि.ली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पलटून फवारण्या घ्याव्यात. त्याच बरोबर डायथेन एम-४५, ०.३% हे बुरशीनाशक + स्टिकरचा वापर करावा. |
| खरबूज | लागवड | खरबूज पिकाचे नियोजन असल्यास दांडाच्या काठाने लहान आळयामध्ये बी टोकून २-३ किलो./ हे. पेरणी करावी, त्यासाठी सुधारित वाण हरा मधु, पुसा शरबती, पंजाब सुनहरी, अर्का राजहंस, अर्का जीत, पुसा मधुरस व स्तानिक वाण यापैकी निवड करून दांडाचे काठाने लहान आळयामध्ये 2 मी.* ६० सें. मी.अंतरावर बी टोकावे, संकरीत जातीकरिता २*१ मिटर अंतर ठेवावे. |
| फळझाडे (संत्र /आंबा) | वाढ / फुलोरा | संत्रावरील किडीच्या नियंत्रणासाठी किडीचा प्रादुर्भाव दिसताच प्रती १० लिटर पाण्यात मिसळून खालील किटकनाशकांची फवारणी करावी. आवश्कते नुसार दुसरी फवारणी १० दिवसाच्या अंतराने करावी.<br>• मावा: माव्याच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ई सी १३ मि.ली. किंवा मिथिल डिमेटोन २५ टक्के प्रवाही ८ मि. ली किंवा क्लोरपायरीफॉस २० टक्के , १०-२० मि.ली ची फवारणी करावी.<br>• कोळी: डायकोफॉल १८.५ मि.ली ची फवारणी करावी.<br>• पिठ्या ढेकुण: व्हटीसेलियम लेकॉनी १.१५ टक्के भुक्ती ५० ग्रॅम ची फवारणी करावी.<br>आंबा मोहोरवरील भुरी रोगाचे नियंत्रणासाठी हेक्षाकोनाज़ोल ५ टक्के एससी १० मी.ली किंवा पेनकोनाज़ोल १० टक्के ईसी ५ मी.ली किंवा गंधक ८० टक्के डब्लू पी ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| पशु व जनावरे | | जनावरामध्ये लाळयाकुर्ध रोगाच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधनात्मक लसीकरण करून घावे तसेच शेळया-मेंढ्यामध्ये बुळकांडी प्रतिबंधनात्मक लसीकरण करून घावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.